| | |
|---|---|
| MHGA080000842026 | दाखल तारीख : २६/०२/२०२६<br>नोंदणी तारीख : २६/०२/२०२६<br>निकाल तारीख: २४/०३/२०२६<br>कालावधी : ००वर्षे, ००महिने, २६दिवस |

# न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सिरोंचा यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी उन्मेश बा. श्रीराम)

## किरकोळ फौजदारी प्रकरण क्रमांक १४/२०२६

**निशाणी क्र. ०१**

**चिरंजीव किष्टय्या सोदारी,**
वय- ३५ वर्षे, धंदा- शेती,
रा. अमरावती, तह. सिरोंचा,
जि. गडचिरोली. ... **अर्जदार**

- **विरुद्ध** -

**तपासी अधिकारी,**
पोलीस स्टेशन, **सिरोंचा**,
तह सिरोंचा, जिल्हा-गडचिरोली. ...**गैरअर्जदार**

---

उपस्थितीः- श्री.ए. एस. पोट्टाला, अर्जदारा तर्फे विधिज्ञ.
श्री.के.व्ही.तोकलवार, गैरअर्जदारा तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

---

**अपराध क्र.३९/२०२६, पोलीस स्टेशन, सिरोंचा या गुन्ह्यामध्ये गैरअर्जदाराने जप्त केलेली होंडा कंपनीची शाईन दुचाकी वाहन जिचा नोंदणी क्र.MH-33-R-6959 सुप्रतनाम्या वर मिळण्या बाबत कलम ५०३ भा.ना.सु.सं. अन्वये अर्ज.**

**आदेश निशानी क्र.०१ वर**

(दिनांक २४/०३/२०२६)

अर्जदार नामे चिरंजीव किष्टय्या सोदारी, रा.अमरावती, तह. सिरोंचा, जि. गडचिरोली यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये

प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार अपराध क्र. ३९/२०२६ यामध्ये पोलीस स्टेशन, सिरोंचा यांनी जप्त केलेली होंडा कंपनीची शाईन दुचाकी वाहन जिचा नोंदणी क्र.MH-33-R-6959 हे सुप्रतनाम्यावर मिळण्यासाठी विनंती करीत आहे. अर्जदार यांचे वाहन प्रस्तुत गुन्ह्यात कलम ६५(अ), ८३ महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये जप्त करण्यात आले आहे.

**०२.** अर्जदार यांनी वरील वाहन त्यांच्या मालकीचे असल्याचे म्हटले आहे. सदर वाहन पोलीस स्टेशन, सिरोंचा यांनी जप्त केलेले आहे. अर्जदाराने आवश्यक ते कागदपत्र दाखल केल्याचे म्हटले आहे व न्यायालय लादेल त्या अटीवर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जावर सहायक सरकारी अभियोक्ता श्री. के. व्ही. तोकलवार यांनी व तपासी अधिकारी यांनी खुलासा नि.क्र.६ सादर केला. तपासी अधिकारी यांनी त्यांचा खुलासा मध्ये वाहन जप्त असल्याचे मान्य केले आहे. सदर वाहन हे गुन्ह्यात वापरले असल्यामुळे अर्जदार यास परत केल्यास सदर वाहन पुन्हा गुन्ह्यात वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहन अर्जदार यास परत करु नये असे कथन करुन आक्षेप नोंदविला आहे.

**०४.** सदरच्या प्रकरणात अर्जदाराने अर्जासोबत नमुद वाहन सोडविण्या करीता वाहनाच्या नोंदणी पत्राची पडताळीत प्रत, अर्जदाराच्या आधारकार्डाची पडताळीत प्रत तसेच पोलीस स्टेशन, सिरोंचा येथील अपराध क्र.३९/२०२६ मधील एफ.आय.आर. ची प्रत दाखल केली आहे. तसेच सदर वाहनाचे मुळ दस्तऐवज आज पडताळणी करीता सादर केले. वाहन नोंदणी प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, जप्त वाहनाचे मुळ मालक अर्जदार हे आहेत. प्रस्तुत वाहनाचा अर्जदार व्यतिरीक्त अन्य कोणीही ताबा मागितलेला नाही. तसेच इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीचा वाहन परत करण्यास आक्षेप नाही. वाहन पोलीस स्टेशनला पडून

राहिल्यास खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचे वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदाराला देणे सोयीस्कर होईल. म्हणून हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येतो.

०२. जप्त वाहन होंडा कंपनीची शाईन दुचाकी वाहन जिचा नोंदणी क्र.. MH-33-R-6959, चेसिस क्र. **ME4KC851GG7396293** व इंजिन क्रमांक **JC65E70592236** हे अर्जदाराला रूपये **७०,०००/–** (अक्षरी सत्तर हजार रुपये फक्त) च्या सुप्रतनामा बंधपत्रावर तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येते. अर्जदाराने स्वत: सुप्रतनामा खालील अटी व शर्ती नमुद करून या न्यायालयात द्यावा.

०३. अर्जदार याने वरील वाहनाबाबत विक्री, गहान अथवा इतर कुठलाही व्यवहार केस प्रलंबित असेपर्यंत करू नये तसेच वाहनाच्या परिस्थिती मध्ये देखील बदल करू नये व न्यायालयाला आवश्यक वाटल्यास वाहन न्यायालयात किंवा न्यायालय निर्देश देईल त्या ठिकाणी हजर करावे. सदर वाहनाचा वापर अर्जदाराने कोणत्याही बेकायदेशीर कृत्याकरिता करु नये. अर्जदाराने अर्जासोबत दाखल केलेली सर्व कागदपत्रांच्या प्रती तपासी अधिकारी यांच्याकडे दयाव्या.

०४. तपासी अंमलदार पोलीस स्टेशन, सिरोंचा यांनी वरील वाहन अर्जदार चिरंजीव किष्टय्या सोदारी, रा.अमरावती, तह.सिरोंचा, जि.गडचिरोली यांच्या ताब्यात द्यावे व त्याबाबतचा पंचनामा तयार करुन छायाचित्रां सह दोषारोपपत्रा सोबत न्यायालयात दाखल करावे.

०५. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणात वर दिलेल्या अटी व शर्तीचा भंग केल्यास सुप्रतनाम्याची रक्कम व्यतिरिक्त रुपये **७०,०००/–** (अक्षरी सत्तर हजार

रुपये फक्त) दंड स्वरुपात न्यायालयात भरुन देण्यास जबाबदार राहिल.

०६. सदर अर्जाचे केस पेपर व आदेशाची प्रत तपासी अंमलदार/फौजदारी शिरस्तेदार यांनी आरोपपत्रासोबत दाखल करावे.

Digitally signed by UNMESH BALU SHRIRAM
Date: 2026.03.31 16:40:10 +0530

**(उन्मेश बा. श्रीराम)**

दिनांकः- २४/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी),
सिरोंचा.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. आदेशामधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | विठ्ठल विश्वांभर मिट्ठेवाड<br>लघुलेखक (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>सिरोंचा. |
| आदेशाची तारीख | : | २४/०३/२०२६. |
| मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याची तारीख | : | २४/०३/२०२६. |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ३१/०३/२०२६. |

Digitally signed by VITHAL VISHWAMBHAR MITHEWAD
Date: 2026.03.31 16:42:30 +0530

(विठ्ठल विश्वांभर मिट्ठेवाड)
लघुलेखक (श्रेणी-३)
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
सिरोंचा.